

वाहतूक कोंडी तातडीने सोडवा - अजित पवार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 27/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 166 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# ‘हिंजवडी’तील समस्या

## अडथळा आणल्यास गुन्हे दाखल करा - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : ‘राजीव गांधी आयटी पार्क हिंजवडी, माण, मारुंजी परिसरातील वाहतूक कोंडी, पावसाळी पाणी वाहून जाण्याची व्यवस्था कायमस्वरूपी करण्यासाठी नाइलाजाने कठोर निर्णय घेतले जाणार असून, कोणी अडथळा आणल्यास सरकारी कामात अडथळा आणल्याचे गुन्हे दाखल करा, असे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना दिले.**





या परिसरातील रस्त्यांची रुंदी वाढविली जाणार असून, ओढे, नाल्यांवरील अनधिकृत बांधकामे पाडली जाणार आहेत. रस्ता रुंदीकरणात अधिकृत बांधकाम जाणाऱ्यांवर अन्याय होऊ देणार नसल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

हिंजवडी परिसरातील समस्यांची पाहणी केल्यानंतर पवार यांनी आकुर्डीतील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. ‘हिंजवडीतील विकास कामाच्या आड कोणी आले, तर समजून सांगावे. प्रत्येकजण काही तरी बोलेल ते होऊ द्यायचे नाही. एखादाच संपूर्ण काम करायचे ठरले आहे. त्यामुळे कोणी विनाकारण अडथळा आणल्यास कलम ३५३ नुसार सरकारी कामात अडथळा आणल्याचे गुन्हे दाखल करा.’ असे आदेश उपमुख्यमंत्री पवार यांनी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना पाहणीदरम्यान दिले. ‘पहिल्या पावसात हिंजवडी परिसरात विविध अडचणी निर्माण झाल्या. अभियंत्यांना त्रास सहन करावा लागला. ही बाब सरकारने गांभीर्याने घेतली. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, मेट्रो या संस्थाना विश्वासात घेऊन अडचणी सोडविल्या जात आहेत. त्याला चांगल्या प्रकारे सुरुवात झाली आहे. त्यामुळे काही लोकांनी समाधान व्यक्त केले. नाइलाजाने काही ठिकाणी कठोर निर्णय घ्यावे लागतात. कोणाला नाराज करायचे नाही. त्रास द्यायचा नाही.

परंतु, या परिसरातील वाहतुकीचे दुखणे, पावसाळी पाणी वाहून जाण्याची व्यवस्था कायमस्वरूपी केली जाणार आहे.’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# हिंजवडी आयटी कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रॉम होम’ सुविधा सुरु करा - सुप्रिया सुळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



हिंजवडी परिसरातील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या असून याचा फटका माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी पार्क) कंपन्यांना आणि कर्मचाऱ्यांना बसत आहे. हिंजवडी आयटी कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रा ॅम होम’ ही सुविधा सुरू करावी आणि येथील शाळांच्या वेळेत बदल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

जोपर्यंत पायाभूत सुविधांची सखोल अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत बंगळुरू आयटी पार्कच्या धर्तीवर आठवड्यातील केवळ दोन दिवस कर्मचाऱ्यांना बोलवावे, असे पत्र राज्य सरकार आणि ‘हिंजवडी आयटी असोसिएशन’ला पाठविले असल्याचेही सुळे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील शनिवारी पुणे दौऱ्यावर असून त्यांनी हिंजवडी येथील पायाभूत सुविधांची पाहणी करून बैठकांद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. याबाबत ‘सरकारला उशिरा आलेले शहाणपण आहे’ अशा शब्दात खासदार सुळे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना टोला लगावला.

पवार म्हणाल्या, ‘गेल्या अनेक महिन्यांपासून हिंजवडी परिसरातील अडचणींबाबत राज्य सरकार, स्थानिक प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठकीची मागणी करत आहे. मात्र, सरकारचा एकतर्फी कारभार सुरू आहे.

आम्हाला कोणत्याच बैठकीला बोलावले जात नाही. तेथील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या असून याचा मोठा फटका आयटी कंपन्यांना बसत आहे.’

# पीसीईटीच्या विद्यार्थ्यांना आकर्षक पगाराच्या नोकऱ्या



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व नूतन ग्रुपच्या पीसीसीओई, पीसीसीओईआर व नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अंतिम वर्षातील १,७२२ विध्यार्थ्यांसाठी आतापर्यंत १,५९३ नोकऱ्या मिळाल्या आहेत. पुढील सहा महिन्यात आणखी नोकरी मेळावे होणार आहेत अशी माहिती पीसीईटी, नूतन सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी पीसीईटीच्या वतीने प्रसिद्धीस दिली आहे.**

विद्यार्थ्यांची निवड नामांकित अश्या आयटी कंपन्यात झाली आहे. यामध्ये कॅपजेमिनी (३५६), ॲक्सेंचर (२४३), टेक महिंद्रा (१२८), एलटीआय माईंड ट्री (७७), केपीआयटी (६५), कॉग्निझंट (५२) या कंपन्यांचा समावेश आहे.तसेच आयटी प्रॉडक्ट कंपन्यानी खूपच आकर्षक वार्षिक पगार देण्याचे जाहीर केले आहे. त्यामध्ये लिंक्डइन (६० लाख रुपये), ॲमेझॉन (४७.८८ लाख रुपये), कॉमव्हॉल्ट सिस्टिम्स (३३ लाख रुपये), लेमा (३० लाख रुपये) तर पीसीईटीच्या विद्यार्थ्याला आता पर्यंतचे सर्वाधिक वार्षिक पॅकेज उबेर कंपनीतील ६१ लाख रुपये देण्यात आले आहे. तसेच रोजगाराच्या संधी दिलेल्या इतर कोअर मॅन्युफॅक्चरींग कंपन्यांमध्ये फिलिप्स, महिंद्रा अँड महिंद्रा, डसॉल्ट सिस्टिम्स, टाटा टेक्नॉलॉजीज, ॲटलस कॉप्को, गोदरेज, मिंडा, अल्फा लावल या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. पीसीईटीचे सेंट्रल प्लेसमेंट सेल कॅम्पस इंटरव्यू मध्ये दरवर्षी विध्यार्थ्यांना सुमारे ३५० नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी उपलब्ध करून देते.

निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. हरीश तिवारी, डॉ. जहागीरदार, डॉ. सपली, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

पीसीईटी, नूतनच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. संदीप पिल्लेवार, प्रा. दीपक पवार, प्रा. ऋषिकेश पांडे, प्रा. विजय टोपे, प्रा. हीना शर्मा, प्रा. डेन्झेटा लोबो, मंगेश काळभोर सर्व विभागातील ट्रेनिंग प्लेसमेंट चे शिक्षक प्रतिनिधी व २०० हुन अधिक विध्यार्थी प्रतिनिधी यांनी वेळोवेळी रोजगार मेळाव्याच्या आयोजनात योगदान दिले.

# कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळवाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्य पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत हा सामाजिक उपक्रम संपन्न झाला. भाजप पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम समाजसेवेचा संदेश देणारा ठरला.




हा उपक्रम भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या नेतृत्वात पार पडला. भाजप ओबीसी VJNT आघाडी अध्यक्ष गणेश ढाकणे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष (भटके विमुक्त) कैलास सानप यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

यावेळी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी रुग्णालयात उपस्थित राहून रुग्णांशी संवाद साधला. त्यांनी रुग्णांना फळांचे वाटप केले. त्यांच्या उपस्थितीने रुग्णांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी, काटे म्हणाले की, "पंकजाताई मुंडे यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे ही आमची जबाबदारी आहे. या फळवाटपातून रुग्णांना थोडा दिलासा मिळेल, त्यांना शुभेच्छा देण्याचा हा प्रयत्न आहे."

या उपक्रमात भाजपा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा अध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार उमाताई खापरे, प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, नगरसेवक संदीप भाऊ वाघेरे, नगरसेवक मोरेश्वर शेडगे, पिंपरी/दापोडी/बोपखेल मंडल अध्यक्ष अनिता गणेश वाळुंजकर, नरेश पंजाबी, मनीष पंजाबी, चिंचवड/काळेवाडी मंडल आध्यक्ष हर्षद नढे, रहाटणी पिंपळे सौदागर मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकीर, मनोज ब्राम्हणकर, जयेश चौधरी, गणेश वाळुंजकर, दीपक नागरगोजे, डॉ. नारायण जायभाय, रेखाताई काटे, मीनाक्षी गायकवाड, अमोल नागरगोजे, रवी बांगर, प्रकाश लोहार, चंदन केदार, ओम प्रकाश शर्मा, मनोज तोरडमल, खंडू कटारे, दत्ताभाऊ ढगे, हनुमंत रामनाथ घुगे, चंदन केदार, शुभम पालवे, सोनू पालवे, मारुती पालवे, उद्धव खेडकर, भागवत खेडकर, अमित कुदळे, गुलाबराव मारणे यांसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुग्णालय प्रशासनाने या उपक्रमाचे स्वागत करत आभार व्यक्त केले.

# खासदार श्रीरंग बारणे यांचा विशेष पुरस्काराने गौरव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**लोकसभेतील सातत्यपूर्ण कामगिरीनिमित्त प्राईम पॉईंट फौडेशनतर्फे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांना 'संसदीय लोकशाहीत प्रभावी सातत्यपूर्ण योगदान' पुरस्काराने गौरविण्यात आले. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात हा कार्यक्रम झाला. दरम्यान, खासदार बारणे यांना यापूर्वी प्राईम पॉईंट फौडेशनतर्फे पाच वेळा संसदरत्न, एकवेळा संसदमहासंसदरत्न, एकदा संसद विशिष्टरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**



लोकसभेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना प्राईम पॉईंट फौडेशनतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. फौडेशनतर्फे दरवर्षी लोकसभा, राज्यसभेतील विशेष कामगिरी केलेल्या खासदारांना सन्मानित करण्यात येते. यंदा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरण रिजूजी यांच्या हस्ते खासदार बारणे यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी ज्युरी कमिटीचे अध्यक्ष तथा राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, प्राईम पॉईंट फौडेशनचे अध्यक्ष के. श्रीनिवास, प्रियदर्शनी राव, जेष्ठ खासदार भर्तृहरी महताब उपस्थित होते.

केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरण रिजूजी म्हणाले, जगातील खासदारांच्या तुलनेत भारतातील खासदारांचे जीवन संघर्षमय आहे. सकाळी उठल्यापासून रात्री उशिरापर्यंत लोकांच्या कामे करावी लागतात. त्यांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. गटार तुंबणे, रस्त्यावरील खड्डे ते देशातील अशी विविध प्रकारची कामे करावी लागतात. त्यासाठी सतत कार्यरत राहून खासदारांना खूप कामे करावी लागतात. पुरस्कार मिळालेले खासदार संसदेतील प्रभावशाली आहेत. अनेक वर्षांचा त्यांचा संसदेतील दांडगा अनुभव आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. प्राईम पॉईंट फौडेशनतर्फे पुरस्कार मिळणारे खासदार भाग्यवान आहेत.

# प्रशासनाच्या गैरकारभाराने नागरिक हैराण!

## विजय शिंदे यांची प्रशासनावर जोरदार टीका!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड शहरातील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर सुरू असलेल्या ठेकेदारांच्या मनमानी कामांवरून माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. पावसाळ्यात खोदकामाला परवानगी नसतानाही सर्रासपणे सुरू असलेल्या कामांमुळे वाहनचालक आणि सामान्य नागरिक प्रचंड त्रस्त झाले असून, याला महानगरपालिकेतील प्रशासकीय राजवट जबाबदार असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.





स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक नसल्याचा फायदा घेत प्रशासन, ठेकेदार आणि बांधकाम व्यावसायिक एकत्र येऊन हा गैरकारभार करत असल्याचा आरोप विजय शिंदे यांनी केला आहे. यामुळे प्रामाणिक करदात्यांना आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागतोय, असेही ते म्हणाले.

विजय शिंदे यांनी निदर्शनास आणून दिले की, जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर विविध कामांसाठी पोकलेन, जेसीबी, क्रेन यांसारखी अवजड यंत्रसामुग्री वापरली जात आहे. पावसाळ्यात ही कामे थांबवणे अपेक्षित असतानाही, ठेकेदार नियम धाब्यावर बसवून काम करत आहेत. यामुळे या मार्गावर सातत्याने भयंकर वाहतूक कोंडी होत असून, जिथे काही मिनिटांत पोहोचायचे असते, तिथेही तासन्तास लागत असल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत.

कामांमध्ये नियोजनाचा पूर्णपणे अभाव दिसून येत असल्याचे विजय शिंदे यांनी सांगितले. मोठे डंपर चुकीच्या बाजूने (wrong side) येतात, लहान गाड्यांना पुढे जाण्यासाठी रस्ता देत नाहीत, ज्यामुळे वाहतुकीची कोंडी आणखी गंभीर होते. कामाचे योग्य नियोजन नसल्यामुळे रस्त्यांवर चिखल साचला आहे आणि वाहने बराच काळ थांबून राहिल्याने प्रदूषणाची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. हे सर्व पर्यावरणासाठीही अत्यंत हानिकारक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

महापालिका प्रशासन या गंभीर परिस्थितीकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी केला आहे. कोणतीही देखरेख नाही की दोषींवर कारवाई नाही. सिमेंट रस्त्यांमध्ये बिल्डर आणि ठेकेदार सर्रासपणे नियम मोडून पाइपलाइन आणि ड्रेनेज लाइनसारखी कामे करत आहेत. गेल्या काही वर्षांपासून प्रशासकीय यंत्रणेत मोठ्या प्रमाणात फेरबदल झाले असून, जुन्या अनुभवी अभियंत्यांना बाजूला करून हे प्रकार सुरू आहेत. यामागे मोठा भ्रष्टाचार असल्याचा दाट संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात असून, विजय शिंदे यांनीही या संशयाला दुजोरा दिला.

या गंभीर प्रकारामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. ठेकेदारांची मनमानी आणि प्रशासनाचा गैरकारभार असाच सुरू राहिल्यास, जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील प्रवाशांचा मनस्ताप आणखी वाढण्याची भीती विजय शिंदे यांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# वाहतूक कोंडी तातडीने सोडवा - अजित पवार

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्र (आयटी पार्क) हिंजवडी परिसरासह माण, म्हाळुंगे, सूस आदी भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने कराव्यात, मेट्रोची सुरु असलेली कामे गतीने पूर्ण करावीत, विविध विकास कामे व रस्त्याची कामे करताना स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना विश्वासात घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.**



आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय येथे आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) अतिरिक्त मुख्याधिकारी विजय राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता दूरगामी विचार करून रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे आहे. रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासह भूसंपादनाची कामे गतीने पूर्ण करावीत. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावे. नाले, ओढ्याच्या काठावरील अतिक्रमण काढण्यासह राडारोडा काढून नैसर्गिक पाण्याचे प्रवाह मोकळे करावे. कामात अडथळा आणणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करावी.

नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करता येत्या काळात त्यांना पायाभूत सुविधा मिळव्याच्यादृष्टीने सर्व संबंधित यंत्रणेने समन्वयाने काम करावे. सद्यस्थितीत रस्त्याच्या दोन्ही बाजुच्याकडेला तसेच अंडरपासखाली वाहने थांबणार नाही, तसेच जड आणि अवजड वाहतुकीचे नियोजन करावे. वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना अमंलबजावणीकरिता नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे.

वाढत्या नागरीकरणाचा विचार करुन रस्ते, पाणी, रुग्णालये, शाळा, मलनिस्सारण प्रकल्प, कचरा, वाहतूक, प्रदुषण आदी बाबींचा शहर नियोजन आराखड्यात समावेश करावा. कासारसाई कालवा बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील शिक्के कमी करण्यात येतील, मंत्रालय स्तरावरील मंजुरी प्रस्तावाबाबत संबंधित विभागाचे मंत्री, सचिव आदींसोबत बैठक घेऊन त्यामध्ये सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, असेही पवार म्हणाले.

# आपत्तीकालीन परिस्थितीसाठी महापालिका सज्ज




पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आपत्तीकालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा अग्निशमन विभाग सज्ज झाला आहे. अग्निशमन विभागाने प्रत्येक प्रभागनिहाय विशेष पूर नियंत्रण पथके कार्यरत केली आहेत. या पथकांची जबाबदारी पूरस्थितीत त्वरित मदत पुरवणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे आणि परिसरातील बचावकार्य सुकर करणे, अशा स्वरूपाची असणार आहे.

महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे बचाव कार्यासाठी पुरेशा प्रमाणात उपकरणे उपलब्ध आहेत. त्यामध्ये १० रबर बोट्स (IRB), २०० लाइफ जॅकेट्स, ४४ लाइफ रिंग्स, ५९ रोप्स, १० हुक्स, १३ पोर्टेबल पंप, वॉटर टेंडर, क्विक रिस्पॉन्स व्हेईकल, फायर फायटिंग मोटारसायकल, ४८ कार्यरत अग्निशमन वाहने, वायरलेस सेट्स, वॉकीटॉकी, मेगाफोन व टॉर्चेस यासारख्या आधुनिक साहित्यांचा समावेश आहे.

नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत संबंधित प्रभागीय कार्यालय अथवा अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. जेणेकरून आपत्तीकालीन परिस्थितीमध्ये पथके त्वरित घटनास्थळी पोहोचतील. तसेच ज्या भागात पाणी शिरण्याचा धोका आहे, अशा भागांची यादी तयार करण्यात आली असून त्या भागात पथकांनी गस्त वाढवली आहे. आवश्यकतेनुसार १०० (पोलीस), १०१ (अग्निशमन), १०८ (आपत्कालीन मदत क्रमांक) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

महापालिकेच्या पथकांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी असून ते पूरग्रस्त भागांची ओळख, पाण्याची पातळी, वाहणाऱ्या पाण्याचा वेग आणि साचणाऱ्या ठिकाणांची माहिती ठेवतात. पथकांना स्थानिक परिसराचे अचूक ज्ञान आहे तसेच पथकातील सदस्यांना पोहण्याचे व रेस्क्यू तंत्राचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तरी पूरस्थिती किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास घाबरून न जाता, चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवता महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकांची मदत घ्यावी. ही मदत पूर्णतः विनामूल्य उपलब्ध आहे, असेही अग्निशमन विभागाकडून कळवण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968